सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## नोंदणी व मुद्रांक विभाग

## नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय

**तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर,पुणे** 411 001

### जाहिरात क्रमांक - 01 /2025

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक प्रनिमं 1222/प्र.क्र.54/का.13- अ दिनांक 4 मे 2022, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रानिमं 1222/प्र.क्र. 136/का-13 दिनांक 21 नोव्हेंबर 2022, महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील पत्र क्रमांक आस्थाप-2021/448/प्र.क्र.92/म-1 दिनांक 19.05.2022 ,दिनांक 22.11.2022 आणि दिनांक 07.12.2022, महसूल व वनविभाग यांचेकडील पत्र क्रमूांक आस्थाप-2023/1030/प्र.क्र.211/म-1 दिनांक 24.06.2024 आणि दिनांक 22.11.2022 अन्वये विहित तरतुदी आणि निर्देशानुसार नोंदणी व मुद्रांक विभागात गट ड (शिपाई)संवर्गाची नोंदणी व मुद्रांक विभागाकडील सरळसेवेने भरावयाची रिक्त पदांची भरती करीता प्रस्तूत जाहिरातीत नमूद केलेप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सरळसेवेने भरावयाच्या पदाकरीता https://ibpsonline.ibps.in/igrcsfeb25 या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांनी www.igrmaharashtra.gov.in या नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे संकेतस्थळावर उपलब्ध असलेली सविस्तर जाहिरात वाचून त्याप्रमाणे विहित मुदतीत अर्ज सादर करावेत. ऑनलाईन भरलेल्या अर्जाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात www.igrmaharashtra.gov.in या नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचून ऑनलाईन (Online) पद्धतीनेच https://ibpsonline.ibps.in/igrcsfeb25 या संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रिये संबंधित आवश्यक अद्यावत माहिती प्राप्त करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

## 1. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक

| अ.क्र | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| 1. | ऑनलाईन पद्धतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | दिनांक 22.04.2025 |
| 2. | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक 10.05.2025 |
| 3. | ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | दिनांक 10.05.2025 |
| 4. | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या आधी 7 दिवस |

परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र प्रवेशपत्रामध्ये नमूद केले जाईल. परीक्षेचे प्रवेशपत्र हे परीक्षेपूर्वी 7 दिवस आधी प्राप्त करून घेण्यासाठी वेगळ्याने नविन लिंक ही www.igrmaharashtra.gov.in या नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल त्यामुळे आपण सातत्याने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे संकेतस्थळ पाहत राहण्याची जवाबदारी प्रत्येक उमेदवाराची आहे

## 2. अर्ज करण्यासाठीची महत्वाची सूचना -

1. ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक व बंधनकारक आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली गेल्यामुळे भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची कसल्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी काळजीपूर्वक भरावी. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.
2. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/परीक्षाकेंद्र/ बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध राहिल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.
3. उमेदवाराला परीक्षा तसेच कागदपत्रे पडताळणीसाठी सर्व संबंधित ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
4. ऑनलाईन परीक्षेचे (Computer Based Test) आयोजन महाराष्ट्र राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अमरावती, लातुर, मुंबई आणि कोंकण विभागातील खालील नमुद विविध शहरांमध्ये केले जाईल. उमेदवाराने निवड केलेल्या परीक्षाकेंद्रात कोणत्याही परिस्थितीत बदल होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| अहिल्यानगर | नागपुर |
| अकोला | नांदेड |
| अमरावती | नंदुरबार |
| बीड | नाशिक |
| भंडारा | परभणी |
| चंद्रपुर | पुणे |
| छत्रपती संभाजीनगर | सांगली |
| जळगाव | सातारा |
| कोल्हापुर | सिंधुदुर्ग |
| लातुर | सोलापुर |
| मुंबई/नवी मुंबई/ठाणे/एमएमआर | यवतमाळ |

3. **परीक्षा शुल्क** –

1. खुल्या प्रवर्गाच्या उमदेवारांसाठी रु 1000/-
2. मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु 900/-
3. अनाथ उमेदवारांसाठी रु 900/-
4. माजी सैनिक/दिव्यांग माजी सैनीक यांचेसाठी परीक्षा शुल्क माफ राहील.
5. फक्त ऑनलाईन पध्दतीनेच परीक्षा शुल्क स्विकारले जाईल.
6. उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बैंक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील. परिक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.
7. परीक्षा शुल्क भरल्याबाबतची ऑनलाईन चलनाची (पावती) प्रत ही ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जाच्या प्रतीसोबत कागदपत्रांच्या तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

4. **अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना**

1. उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.igrmaharashtra.gov.in या लिंकवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी.

2. उमदेवारास अर्ज सादर करताना काही समस्या उद्भवल्यास http://www.cgrs.ibps.in/ या लिंकवर अथवा 1800 222 366 /1800 103 4566 या हेल्पलाईनवर कार्यालयीन वेळेत सकाळी 09.30 ते सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत संपर्क साधावा.

3. ऑनलाईन फी भरणेसाठी दि. 12.05.2025 वेळ 23:59 वाजे पर्यंत मुदत राहील.

4. अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल (copy) करणे, वशीला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या

उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अपात्र ठरविणे इत्यादी यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल.

5. वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल.

6. शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

7. गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास कागदपत्र पडताळणीचे वेळी उमेदवारांनी गुणपत्रकासोबत श्रेणीची (Grade) यादी सादर करावी.

8. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

अ. प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.

ब. अर्ज सादरीकरण

क. शुल्क भरणा

5. **प्रोफाईल निर्मिती/ प्रोफाईल अद्ययावत करणे**.

1. https://ibpsonline.ibps.in/igrcsfeb25 या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता "नवीन वापरकर्त्याची नोंदणी" ("Click here for New Registration") वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नाव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाव्दारे विचारलेली सर्व माहिती भरून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.
2. प्रोफाईलव्दारे माहिती भरताना उमेदवाराने स्वतःचाच वैध ई-मेल आयडी, वैध भ्रमणध्वनी क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.
3. उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रकियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध व कार्यरत राहणे आवश्यक आहे.

4. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वतःच्या Login व Password व्दारे प्रवेश करून प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

5. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :- नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलव्दारे विचारलेली माहिती भरून झाल्यानंतर उमेदवाराने स्वतःचे छायाचित्र फोटो (रुंदी 4.5 से.मी. x उंची 3.5 से.मी.) व स्वतःची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी.

5.1 पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करू नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टेपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.

5.2 छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परिक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.

5.3 विहित आकार / क्षमतेप्रमाणे काळ्या शाईच्या (बॉल) पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी. उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.

5.4 वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.

5.5 स्कॅन करून अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र/हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी, प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

A. **अर्ज नोंदणी**

1. उमेदवारांनी https://ibpsonline.ibps.in/igrcsfeb25 या संकेतस्थळावर जाऊन "Click here for New Registration " या पर्यायावर क्लिक करा जेथे एक नवीन स्क्रीन उघडेल.

2. अर्ज नोंदणी करण्यासाठी, नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक करा (Click here for New Registration) टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ईमेल आयडी प्रविष्ट करा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रीनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा.

तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड दर्शविणारा ईमेल आणि एस.एम.एस. देखील पाठविला जाईल.

3. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरू शकत नसेल, तर तो "सेव्ह आणि नेक्स्ट (Save & Next) टॅब निवडून आधीच एंटर (Enter) केलेला डेटा जतन करू शकतो. ऑनलाइन अर्ज "सबमिट (Submit) करण्यापूर्वी उमेदवारांना ऑनलाइन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी सेव्ह आणि नेक्स्ट (Save & Next) सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि आवश्यक असल्यास त्यात बदल करावा. दृष्टिहीन उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सबमिशन करण्यापूर्वी ते बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडताळणी करून घ्यावी.

4. उमेदवारांनी ऑनलाइन अर्जातील तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी करावी, कारण "पूर्ण नोंदणी (COMPLETE REGISTRATION BUTTON) बटणावर क्लिक केल्यानंतर कोणताही बदल शक्य होणार नाही/करणे शक्य होणार नाही.

5. उमेदवाराचे नाव किंवा त्याचे तिचे वडील/पती इ.चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहिलेले असावे, जसे ते प्रमाणपत्र/गुणपत्रिका/ओळख पुराव्यामध्ये दिसते. कोणताही बदल/ तफावत आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरू शकते.

6. तुमचे तपशील सत्यापित करा (Validate your details) आणि जतन करा आणि पुढील" (Save & Next) बटणावर क्लिक करून तुमचा अर्ज जतन करा.

7. फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.

8. नोंदणीपूर्वी संपूर्ण अर्जाचे पूर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी "पूर्वावलोकन" (Preview) टॅबवर क्लिक करा.

9. आवश्यक असल्यास तपशील सुधारावा आणि छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच नोंदणी पूर्ण वर क्लिक करा' (COMPLETE REGISTRATION)

10. पेमेंट" (Payment) टॅबवर क्लिक करा आणि पेमेंटसाठी पुढे जावे व "सबमिट" (Submit) बटणावर क्लिक करावे.

**B. परीक्षा शुल्क भरणे**

ऑनलाइन मोडः

1. डेबिट कार्ड (RuPay/Visa/Master Card/Maestro), केडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, IMPS, कॅश कार्डस्, मोबाइल वॉलेट वापरून पेमेंट केले जाऊ शकते.

2. व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यावर, एक ई-पावती तयार होईल.

3. ई- पावती तयार न होणे अयशस्वी फी प्रदान दर्शविते.

4. उमेदवारांनी ई-पावती आणि फी तपशील असलेल्या ऑनलाइन अर्जाची प्रिंटआउट घेणे आवश्यक आहे.

**C. छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड (Upload of Photo / Signature) करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे**

- ऑनलाइन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने खाली दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार त्याचा/तिचा फोटो, स्वाक्षरी असणे आवश्यक आहे..
- छायाचित्र प्रतिमा (रूंदी 4.5cm x उंची 3.5cm)
- छायाचित्र अलीकडील पासपोर्ट शैलीचे रंगीत चित्र असणे आवश्यक आहे.
- हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या, पार्श्वभूमीच्या विरुद्ध घेतलेले असावे.
- टोपी आणि गडद चष्मा स्वीकार्य नाहीत.
- परिमाण 200 x 230 पिक्सेल (प्राधान्य )
- फाइलचा आकार 20 kb ते 50 kb दरम्यान असावा.
- स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार 50 kb पेक्षा जास्त नसावा.

**स्वाक्षरी**

- अर्जदाराला काळ्या शाईच्या पेनने पांढऱ्या कागदावर स्वाक्षरी करावी लागेल. स्वाक्षरी कॅपिटल अक्षरांमध्ये नसावी.
- परिमाण 140 x 60 पिक्सेल (प्राधान्य).
- फाइलचा आकार 10kb ते 20kb दरम्यान असावा, स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार 20kb पेक्षा जास्त नाही याची खात्री करा.
- संबंधित लिंकवर क्लिक करा 'छायाचित्र स्वाक्षरी अपलोड करा (Upload of Photo / Signature).

- तुमचा फोटो, स्वाक्षरी अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाइन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.
- छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.
- ऑनलाइन अर्जामध्ये छायाचित्र स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे.
- उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे.

**टीप : ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाइन अर्जाची प्रिंटआउट घ्यावी.**

6. **अर्ज सादरीकरण**

1. सदर अर्ज https://ibpsonline.ibps.in/igrcsfeb25 या संकेतस्थळावर दिनांक 22.04.2025 रोजी पासून भरणेसाठी उपलब्ध होतील.

2. कृपया लक्षात घ्या की, उमदेवारांनी परीक्षा शुल्क दिलेल्या पेमेंट गेटवे द्वारे ऑनलाइन पद्धतीने अदा करावे.

7. **सर्वसाधारण सूचना**

1. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने करावयाची आहे.

2. अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करून देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. संक्षिप्तपणे (Abbreviations) व अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या /पत्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

3. महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव) त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे, विवाह नोंदणी दाखला जमा करणे आवश्यक आहे.

4. एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

5. अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर केलेल्या सारांशपत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अनधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदभांतील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास /न मिळाल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

6. संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरात/ अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करूनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

7. कोणत्याही परिस्थितीत फेरपरीक्षा घेतली जाणार नाही.

8. वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे याशिवाय दुसऱ्या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.

9. उमेदवाराने अर्जात स्वतःचे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करू इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

10. उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

11. अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल, त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

12. भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्यानुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ https://ibpsonline.ibps.in/igrcsfeb25 या संकेतस्थळावर उपलब्ध होईल, याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाव्दारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

13. विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही.

14. वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग / नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधीत दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

15. ज्या उमेदवारांना यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाज कल्याण / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा

सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

16. माजी सैनिकासाठी असलेल्या पदांवर शिफारशीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षित असलेली पदे भरती संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रक, शासन निर्णय यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

17. खेळाडू महिला / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / पदवीधर - पदविकाधारक अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातून पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातून सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार करणेत येईल.

18. वरील अटी व शर्ती नियमा व्यतिरिक्त शासनाने वेळोवेळो निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

19. जाहिराती मधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम असेल.

20. सदर पदभरती नियम / निकषामध्ये पदभरती पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय / शासन शुद्धीपत्रक / शासन अधिसूचना यानुसार बदल होऊ शकतो. जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पदसंख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदार / उमेदवाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे/रद्द करणे / अंशतः बदल करणे इ. बाबतचे सर्व अधिकार हे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे हे कार्यालय स्वतःकडे राखून ठेवत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

21. कागदपत्र पडताळणी वेळेस विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करणे.

सदर परीक्षेच्या निकालानंतर तात्पुरत्या निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | कागदपत्रे/ प्रमाणपत्रे |
|---|---|
| 1. | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| 2. | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| 3. | वयाचा पुरावा/जन्म तारखेचा पुरावा |
| 4. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा |
| 5. | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र |
| 6. | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (चालू आर्थिक वर्षातील) |
| 7. | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| 8. | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |

| | |
|---|---|
| 9. | खेळाडूंसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा |
| 10. | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| 11. | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| 12. | महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या 865 गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला |
| 13. | विवाहीत स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| 14. | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| 15. | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र |
| 16. | पदवीधर - पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |

8. **परीक्षा**

1. जाहिरातीत नमूद पदाकरिता अर्ज केलेल्या परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) करीता वेगळयाने नविन लिंक ही www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. नविन लिंकवर परीक्षेच्या किमान ७ (सात) दिवस अगोदर त्यांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र संकेतस्थळावरून काढून घ्यावे.

2. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्राची प्रिंट व ओळखीचा पुरावा छायाप्रतीसह सोबत ठेवणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारास परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वतःजवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेश पत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी.

3. परीक्षा केंद्र -

उमेदवारांनी उपलब्ध असलेल्या परीक्षा केंद्रामधून परीक्षा केंद्र निवडावे.

(सदरची परीक्षा ही ऑनलाईन पद्धतीने संगणकावर विविध सत्रात घेणेत येणार असल्याने उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्रच उमेदवाराला मिळेल याची हमी देता येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.)

4. ऑनलाईन परीक्षेनंतर पात्र उमेदवारांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. 04 मे 2022 अन्वये कागदपत्रे पडताळणीकरिता बोलावण्यात येईल.

5. काही अपरिहार्य कारणास्तव परिक्षेच्या तारखांमध्ये परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

६. ओळख पटवणे -

1. परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रांसह व उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) /आधार कार्ड, बँक/पोस्ट फोटोसहीतचे पासबुक / फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विद्यापीठ/कॉलेज चे फोटोसहित ओळखपत्र / बार कॉन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक/ पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही. सदर उमदेवाराचे मूळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.

टिप :- उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वतःची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या / मधल्या / शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र /विवाह नोंदणी प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

**रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही**.

2. परीक्षेला उशिरा येण्याबाबत - परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेस उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरू होणाच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दोन तास (120 मिनिटे) असली तरी उमेदवारास ओळख पटवणे. आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण चार तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागेल.

3. निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करण्यात येणारी कार्यवाही –

उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला, तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

7. परीक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवाराने

1. अनुचित प्रकार करणे किंवा,
2. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा,
3. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा,
4. स्वतःच्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा, स्वतःच्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा, भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे,
5. परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी यांच्याशी अरेरावी करणे, उद्धटपणे वागणे, त्यांना लाच देऊ पाहणे.

**अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.**

1. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.
2. जर उमेदवार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या सेवेत आधीच रुजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल.

9. **परीक्षा केंद्र**

1. सदर परीक्षा प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर "ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.
2. परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादी बाबत बदलाची विनंती मान्य केली जाणार नाही

3. उमदेवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावायचे आहे या संबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी / नुकसानीस नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे, कार्यालय जबाबदार राहणार नाही.

10. **पदसंख्या**

1. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे गट ड मधील खालील तक्त्यात नमूद केलेल्या विविध संवर्गाच्या संख्येप्रमाणे भरावयाच्या सर्व पदांचा तपशिल सोबतच्या **परिशिष्ट** 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे

2. पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल (कमी /वाढ) होण्याची शक्यता आहे. तसेच सदरील जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या एकूण रिक्त पदांमध्ये संभाव्य रिक्त पदे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. उमेदवारांच्या निवड प्रक्रियेनंतर रिक्त असणाऱ्या पदांवर नियुक्ती देण्यात येईल. त्यानंतर जसजशी पदे रिक्त होतील त्या प्रमाणे रिक्त होणाऱ्या पदांवर निवड झालेल्या उमेदवारांना नेमणूक देण्याची कार्यवाही नियुक्ती प्राधिकारी करतील.

3. पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या घोषणा / सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदांकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

टिप - 1) सोबतचे परिशिष्ट 1 मध्ये दर्शविलेल्या पदांमध्ये समांतर आरक्षणांतर्गत राखीव दर्शविलेल्या प्रवर्गाचे (दिव्यांग व माजी सैनिक यांचेसाठी राखीव पदे वगळून) पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

11. **आवश्यक शैक्षणिक अर्हता**

सरळसेवेने भरावयाच्या शिपाई पदाची शैक्षणिक अर्हता पुढीलप्रमाणे आहे.
उमेदवार हा किमान माध्यमिक शालांत परीक्षा (एस एस सी) उत्तीर्ण असावा.

12. **वेतनश्रेणी**

एस-01, रु.15000-47600 अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते.

13. **परीक्षेचे स्वरूप, दर्जा व निवडीची कार्यपद्धती**

1. शिपाई पदासाठी परीक्षेचे स्वरूप व दर्जा सोबतच्या **परिशिष्ट** 2 मध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

2. शिपाई पदाकरिता ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.

3. ऑनलाईन परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा सेवा प्रवेश नियमांमध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.

4. ऑनलाईन पद्धतीने परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपात आयोजित केली जाईल. प्रत्येक प्रश्नास 2 गुण याप्रमाणे 100 प्रश्नांसाठी एकुण 200 गुणांची परीक्षा घेण्यात येईल. त्याकरीता 120 मिनीटे इतका कालावधी देण्यात येईल.

5. गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव होण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहिल.

6. ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेणेत येणार असल्यामुळे परीक्षेची प्रश्नपत्रिका किंवा उत्तरपत्रिका याची प्रत उमेदवारांना मिळणार नाही.

7. ऑनलाईन पद्धतीने घेणेत आलेल्या परीक्षेची उत्तरपत्रिका फेर तपासणी करणेत येणार नाही, याबाबत उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे कार्यालय अथवा कंपनीशी संपर्क साधू नये.

8. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक प्रानिमं 1222/प्र.क्र.54/का.13-अ दिनांक 04 मे 2022 अन्वये गट-ड मधील पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही.

9. उमेदवारांना परीक्षेकरीता अर्ज करताना कोणतीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही.

10. तात्पुरत्या निवड यादीमध्ये समावेश होणाऱ्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीकरीता बोलविण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

11. कागदपत्रे पडताळणीसाठी सर्व मुळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

12. कागदपत्र पडताळणीनंतर अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

13. कागदपत्र पडताळणीकरीता ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पारपत्र, पॅन कार्ड, वाहन परवाना यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची एक स्वसाक्षांकित छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

14. **परीक्षेचे वेळापत्रक**

1. परीक्षेचे वेळापत्रक हे www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. त्याकरिता उमेदवारांनी वारंवार संकेतस्थळाला भेट देऊन खात्री करणे आवश्यक राहील.

15. **उमेदवारांना समान गुण मिळाल्यास**

1. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेमध्ये समान गुण मिळाल्यास परीक्षेचा निकाल तयार करताना गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे राहिल.

अ) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहिल.

ब) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अ.क्र. (अ) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

क) वरील अ.क्र. (अ) व (ब) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

ड) वरील अ.क्र. (अ), (ब) व (क) या तिन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत. सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्रथम प्राधान्यक्रम देण्यात यावा.

टीप :- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. एससीवाय 1205/प्र.क्र. 189/म 7, दि. 23 जानेवारी 2006 अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटूंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी / मुलगे/ मुलगी) होय.

संबंधित उमेदवारांनी सदरचा पुरावा सादर करणे बंधनकारक आहे.

16. **निवडसूचीची कालमर्यादा**

निवड समितीने तयार केलेली निवडसूची 1 वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहिल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

17. **उमेदवारांचे अधिवासाबाबत सर्वसाधारण अटी व शर्ती**

अ) उमेदवार भारताचा नागरीक असावा.

ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

क) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मकसी 1007/प्र.क्र.36/का.36 दिनांक 10 जुलै 2008 अन्वये महाराष्ट्र-कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या 865 गावातील मराठी भाषिक उमेदवारांना सदर पदासाठी अर्ज करता येईल.

18. **वयोमर्यादा**

**सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय वयोमर्यादा खालीलप्रमाणे -**

| अ.क्र | आरक्षण | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| 1. | खुला प्रवर्ग | 18 | 38 |
| 2. | मागास प्रवर्ग | 18 | 43 |
| 3. | दिव्यांग उमेदवार | 18 | 45 |
| 4. | प्रकल्पग्रस्त | 18 | 45 |
| 5. | भुकंपग्रस्त | 18 | 45 |
| 6. | अंशकालीन | 18 | 55 |
| 7. | माजी सैनिक | 18 | सशस्त्र दलात केलेली सेवा + 3 वर्ष |
| 8. | माजी सैनिक दिव्यांग | 18 | 45 |
| 9. | खेळाडु | 18 | 43 |
| 10. | अनाथ | 18 | 43 |
| 11. | स्वातंत्र सैनिकाचे पाल्य | 18 | 45 |

टिप – दिनांक 22.04.2025 रोजीचे उमेदवाराचे वय ग्राहय धरण्यात येईल.

19. **सामाजिक व समांतर आरक्षण**

1. **खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) असलेले आरक्षण** - शासनाच्या सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्र.राआधो 4019/प्र.क्र.31/ 16-अ, दिनांक 12 फेब्रुवारी, 2019 व दिनांक 31 मे, 2021 मधील व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहील. सदरहु आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जाहिरात प्रसिध्द झालेल्या आर्थिक वर्षातील वैध असणारे पात्रता प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

2. **महिला आरक्षण -**

2.1 महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक महिआ 2023/प्र.क्र. 123/कार्या-2, दि. 04 मे 2023 अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदांवरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिलांनी तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन -क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने सदर शासन निर्णयान्वये रद्द करणेत आलेली आहे.

2.2 मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागास वर्ग, वियुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) आणि विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

2.3 महिला उमेदवारांनी सादर केलेले नॉन - क्रिमीलेअर प्रमाणपत्र आयुक्त, महिला व बालविकास विभागाकडून तपासणी करून घेणेत येईल.

2.4 महिलांकरिता आरक्षित पदावर पात्र महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील पात्र पुरुष उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

3. **खेळाडू आरक्षण-**

1. खेळाडूंसाठी असलेले समांतर आरक्षण, शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागा कडील शासन निर्णय क्र. राक्रीधो-2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दि.01जुलै, 2016, शासन शुद्धीपत्रक दि.10 ऑक्टोबर, 2017 व शासन शुद्धीपत्रक दि 11 मार्च, 2019 मधील व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहील. त्यांचेकरीता उच्च वयोमर्यादा कमाल 5 वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रिडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पुर्वीचे असणे बंधनकारक आहे. तसेच शासन शुध्दीपत्रक दि . 24 ऑक्टोबर, 2019 मधील तरतुदीनुसार परीक्षेसाठी सादर करावयाच्या अर्जाच्या अंतिम दिनांकाआधी , तो ज्या विभागात वास्तव्यास आहे त्या विभागातील संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केलेला असणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडूने कोणत्या विभागातील उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केला आहे हे आवेदन अर्जात नमूद करणे तसेच, त्याची पोहच पावती सोबत जोडणे बंधनकारक आहे. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून आधीच प्रमाणपत्र पडताळणी करुन घेतलेल्या उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच कागदपत्रे पडताळणीवेळी संबंधित खेळाडूकडे क्रिडा प्रमाणपत्राच्या पात्रतेचा अहवाल असणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर उमेदवार खेळाडू आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही.

2. खेळाडू आरक्षणासाठी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू राहणार नाही.

3. एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

4. **माजी सैनिक आरक्षण** -

1. शासन परिपत्रक साप्रवि क्र.आरटीए 1079/482/16-अ दिनांक 16/04/1981 अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.

2. जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्याबाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

3. तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी केल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

4 सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. आरटीए 9090/62/प्र.क्र. 222/91/28 मुंबई दि. 30 डिसेंबर 1991 अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.

5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. आरटीए 1082/3502/ सीआर- 100 /16-3 दि. 2 सप्टेंबर 1983 अन्वये—

अ) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युद्ध काळात आणि युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक 15% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

ब) युद्ध काळात किंवा युध्द नसताना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंती क्रमाने 15 टक्के आरक्षित पदापैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील. तथापि, सदर उमेदवाराने पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

5. **प्रकल्पग्रस्त आरक्षण** -

1. शासन निर्णय साप्रवि क्र. एईएम 1080/35/163 दिनांक 20 जानेवारी 1980 व शासननिर्णय साप्रवि क्र. भूकंप 1009/प्र.क्र. 207/2009/163 दिनांक 27 ऑगस्ट 2009 नुसार प्रकल्पग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागु करण्यात आलेले आहे.

2. प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित जिल्हयातील जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

3. उमेदवाराने सदर प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

6. **भूकंपग्रस्त आरक्षण** -

1. शासन निर्णय साप्रवि क्र. भूकंप 1009/प्र.क्र. 207/2009/163 दिनांक 27 ऑगस्ट 2009 नुसार भुकंपग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागु करण्यात आलेले आहे.

2. उमेदवाराकडे जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ नुसार दिलेले प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहिल.

3. उमेदवाराने सदर भूकंपग्रस्त प्रमाणपत्राची मूळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

7. **पदवीधर पदविकाधारक अंशकालीन आरक्षण** -

1. शासन निर्णय दि. 27 ऑक्टोंबर 2009 अन्वये पदवीधर पदविकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगार या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे काम केल्याचे

सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

2. रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

8. **अनाथ आरक्षण** -

1. अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक 2018/ प्र.क्र. 122/का-3,दि.6 एप्रिल 2023 तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणारे आदेशानुसार राहील.

2. अनाथांसाठी "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" अशा दोन प्रकारामध्ये आरक्षण देय राहील.

**अ) संस्थात्मक आरक्षण-**

संस्थात्मक आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची 18 वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे व ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थांमध्ये पालन पोषण झाले आहे अशा बालकांचा समावेश असेल. (तसेच महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम 2015 अन्वये कार्यरत बालकांच्या काळजी व संरक्षणाची संबंधित संस्थांमध्ये तसेच महिला व बालविकास विभागाव्यतिरिक्त अन्य विभागांकडून मान्यता प्रदान करणेत आलेल्या अनाथालये अथवा तत्सदृश संस्थांमध्ये पालन झालेल्या अनाथांचा यामध्ये समावेश असेल.)

**ब) संस्थाबाह्य आरक्षण**

संस्थाबाह्य आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची 18 वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले आहे आणि ज्यांचे शासन मान्यताप्राप्त संस्थेबाहेर / नातेवाईकाकडे संगोपन झालेले आहे अशा बालकांचा समावेश असेल.

3. आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराकडे महिला व बालविकास विभागाकडून निर्गमित करणेत आलेले अनाथ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

4. अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.

5. अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवतेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे. त्या प्रवर्गात करण्यात येईल.

9. **सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास आरक्षण**

सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग अधिनियम दिनांक 26 फेब्रुवारी 2024 व संबंधित शासन निर्णय दिनांक 27 फेब्रुवारी 2024 च्या अधिन असेल. या संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित शिफारशी व नियुक्त्या मा. उच्च न्यायालय, मुंबई

येथिल रिट याचिका क्रमांक 3468/2024 व इतर न्यायिक प्रकरणाच्या अधीन राहून करण्यात येतील.

10. **दिव्यांग आरक्षण** -

1. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग 2018/प्र.क्र. 114/16-3, दिनांक 29 मे 2019 तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

2. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

3. दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग / पदांकरिता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल.

4. दिव्यांग आरक्षणाच्या पात्रतेकरीता दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान 40% असणे आवश्यक आहे.

5. दिव्यांग व्यक्तीकरीताचे आरक्षण एकूण समांतर आरक्षण आहे. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या सामाजिक प्रवर्गातून करण्यात येईल.

6. सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे तसेच प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा दिव्यांग उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित पदावर करण्यात येत नाही व दिव्यांगासाठी आरक्षित पदे / पद हे इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात येईल.

7. दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संकेतस्थळावरून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरीत केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

8. दिव्यांग उमेदवार एखाद्या सामाजिक प्रवर्गातील असल्यास संबंधित सामाजिक प्रवर्गामध्ये गुणवत्तेनुसार निवडीसाठी पात्र ठरण्यासाठी व परीक्षा शुल्कामधील सवलतीकरीता संबंधित जातीचे वैध कालावधीचे नॉन क्रिमीलेअर (लागू असल्यास) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

9. लेखनिक व अनुग्रह कालावधी-

1. परिपत्रक क्र.दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि.क.2, दिनांक 05 ऑक्टोबर, 2021 नुसार लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांचे मागणीप्रमाणे लेखनिक व इतर सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. किमान 40 टक्के कायमस्वरुपी दिव्यांगत्व प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. परीक्षा प्रयोजनार्थ उपरोक्त शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार अर्ज भरतेवेळी लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेला परीक्षार्थी आपल्या सद्सदविवेक बुध्दीने लेखनिकाची निवड करणेबाबत ऑनलाईन अर्जामध्ये नमूद करेल. लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व्यवस्था करण्याचे नमूद केल्यास

ऑनलाईन अर्जामध्ये लेखनिकाचे नाव, ओळखीचा पुरावा व प्राप्त शैक्षणिक अर्हतेचे कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक राहील. अशा परिस्थितीमध्ये लेखनिक यांची शैक्षणिक पात्रता सदर परिक्षेकरिता असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी. लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या परिक्षार्थी उमेदवाराने विहीत नमुन्यात लेखनिक यांची माहिती परिक्षा घेणा-या संस्थेस दयावी. लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेला परीक्षार्थींना देण्यात येणा-या भरपाई वेळ प्रति तासाला 20 मिनिटे याप्रमाणे म्हणजेच 2 तासाच्या परिक्षेस 40 मिनिटे भरपाई वेळ अनुज्ञेय राहील.

2. प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना लेखनिकाची मदत आणि अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापासून सात (7) दिवसात दिनांक 17.05.2025 पर्यंत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह या कार्यालयाकडे लेखी विनंती अर्ज करून पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल.

3. लेखनिक संबधित अर्ज दि.17.05.2025 पर्यंत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या gdrecruigr@gmail.com या Email वर सादर करणे आवश्यक राहील. अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच शासनाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

4. परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल, तसेच लेखनिकाची मदत आणि अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

5. प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यापूर्वी कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक सूचनांचे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

Rav

**रविंद्र बिनवडे (भा.प्र.से.)**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**
2/4/2025

# परिशिष्ट-1

## सामाजिक व समांतर आरक्षण तक्ता

| अ. क्र. | प्रवर्ग आरक्षण | एकुण रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व साधारण | महिला (30%) | माजी सैनिक (15%) | दिव्यांग (4%) | प्राविण्य प्राप्त खेळाडू (5%) | प्रकल्प ग्रस्त (5%) | भूकंपग्रस्त (2%) | पदवीधर अंशकालीन (10%) | अनाथ (1%) | |
| 1 | 2 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1 | अनुसूचित जाती | 29 | 10 | 9 | 4 | | 1 | 1 | 1 | 3 | | 29 |
| 2 | अनुसूचित जमाती | 13 | 4 | 4 | 2 | | 1 | 1 | 0 | 1 | | 13 |
| 3 | विमुक्त जाती (अ) | 7 | 3 | 2 | 1 | | 0 | 0 | 0 | 1 | | 7 |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 | 0 | 0 | 0 | | 0 | 0 | 0 | 0 | | 0 |
| 5 | भटक्या जमाती (क) | 11 | 3 | 3 | 2 | | 1 | 1 | 0 | 1 | | 11 |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 10 | 2 | 3 | 2 | एकुण 11 पदे | 1 | 1 | 0 | 1 | एकुण 2 पदे | 10 |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 5 | 1 | 2 | 1 | | 0 | 0 | 0 | 1 | | 5 |
| 8 | इतर मागास प्रवर्ग | 62 | 21 | 19 | 9 | | 3 | 3 | 1 | 6 | | 62 |
| 9 | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) | 28 | 10 | 8 | 4 | | 1 | 1 | 1 | 3 | | 28 |
| 10 | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | 28 | 10 | 8 | 4 | | 1 | 1 | 1 | 3 | | 28 |
| 11 | अराखीव (खुला) | 91 | 29 | 27 | 14 | | 5 | 5 | 2 | 9 | | 91 |
| | एकुण | 284 | 93 | 85 | 43 | 0 | 14 | 14 | 6 | 29 | 0 | 284 |

**टिप** - 1. मा.विभागीय आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, पुणे यांचेकडुन बिंदुनामावली नोंदवहीची पडताळणी केलेनुसार पदभरती करावयाच्या एकुण 284 पदांची शिल्लक अनुशेषाप्रमाणे आरक्षण वरील रकाना क्रमांक 4 मध्ये संख्या नमुद केलेली आहे.

2. एकुण 284 पदांपैकी दिव्यांगासाठी 11 पदे व अनाथ संवर्गासाठी 2 पदे आरक्षित असुन सदरची पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.

## परिशिष्ट-2

## अभ्यासक्रम

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | एकुण प्रश्न | कमाल गुण | परीक्षेचे माध्यम | कालवधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | इंग्रजी | 25 | 50 | इंग्रजी | 30 मिनीट |
| 2 | मराठी | 25 | 50 | मराठी | 30 मिनीट |
| 3 | सामान्य ज्ञान | 25 | 50 | मराठी व इंग्रजी | 30 मिनीट |
| 4 | बौध्दीक चाचणी/ अंकगणित | 25 | 50 | | 30 मिनीट |
| | | 100 | 200 | | 120 मिनीट |

**टिप**- 1) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी 5 पर्याय उपलब्ध असतील.

2) सदर परीक्षेसाठी नकारात्मक गुणपध्दतीचा अवलंब केला जाणार नाही.